# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-14.06.2026** **वार- रविवार**

---

**साहित्य संमेलन**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचं शंभरावं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात पुढच्या वर्षी २८ ते ३१ जानेवारी या कालावधीत होणार आहे. चार दिवसांचं हे संमेलन ऐतिहासिक आणि भव्य स्वरूपात पार पडेल, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. संमेलनाचे संयोजक आणि समर्थ युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, मसापच्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यावेळी उपस्थित होते.
महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक आज पुण्यात झाली; या बैठकीत संमेलनाचं स्थळ आणि तारखांबाबत सर्व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. तत्पूर्वी स्थळ निवड समितीने काल एस. पी. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसराची पाहणी केली होती.
शंभराव्या साहित्य संमेलनाच्या अनुषंगाने, “नांदी शंभराव्या साहित्य संमेलानाची” हा उपक्रम राज्यभरात राबवला जाईल. या उपक्रमातून पुणे, मुंबई वगळता अन्य शहरांमध्ये आणि गावांमध्ये ९९ साहित्यिक उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. आता पर्यंत ज्या ज्या गावांमध्ये साहित्य संमेलनं झाली त्या ठिकाणी येत्या १५ ऑगस्ट ते १५ जानेवारी या कालावधीत हे साहित्यिक उपक्रम राबवले जातील, असंही या पत्रकार परिषदेत सांगण्यात आलं.

**राधाकृष्ण विखेपाटील**

राज्यातलं अपुरं पर्जन्यमान आणि धरणातला उपलब्ध पाणीसाठा विचारात घेवून, येत्या ३१ ऑगस्टपर्यंत नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावं, असे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. या संदर्भात एक महत्त्वाची बैठक आज पुण्यात झाली; त्यावेळी ते बोलत होते. बेकायदा पाणी उपश्यावर तातडीने कडक कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित आधिका-यांना दिल्या.
सद्यस्थितीत राज्यातल्या धरणांमध्ये एकंदर उपयुक्त जलसाठा २५ टक्केच आहे. तो गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी आहे, यावर्षी अजूनही पावसाचं प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे धरणातल्या पाणीसाठ्यात अजूनही वाढ झालेली नाही; विशेषत: पुणे विभागातला उपयुक्त जलसाठा गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी असल्याने परिस्थिती गांभिर्याने हाताळावी असे निर्देश विखे पाटील यांनी या बैठकीत दिले. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगर क्षेत्रातील सुमारे ८५ लाख नागरीकांना ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याचं पाणी उपलब्ध राहण्यासाठी आवश्यक पाणी राखीव ठेवण्याच्या सुचना त्यांनी दिल्या.

दरम्यान पुणे महानगरपालिका क्षेत्रात उद्यापासून एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असं आवाहन पुणे महानगरपालिकेनं केलं आहे.

**ओपनडे**

पुण्यातल्या खडकवासला इथल्या केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्राचा 110वा स्थापना दिवस आज साजरा करण्यात आला. यानिमित्तानं आज सकाळी अकरा ते दुपारी चार या वेळेत संस्थेमध्ये सर्वांना मुक्त प्रवेश देण्यात आला होता. अनेक नागरिक आणि विद्यार्थ्यांनी केंद्राला भेट देऊन माहिती जाणून घेतली.

**योगदिन**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आयुष मंत्रालयाच्या अधिकृत यूट्यूब वाहिनीवर आज योग प्रात्यक्षिकांचं थेट प्रसारण करण्यात आलं. या प्रक्षेपणाद्वारे मंत्रालयानं सर्वाधिक प्रेक्षक संख्येचा नवा गिनीज विश्वविक्रम नोंदवला. या विशेष जागतिक ऑनलाइन योग सत्रात 4 लाख 35 हजार 831 नागरिक सहभागी झाले. या ऐतिहासिक योग सत्रात सहभागी झालेल्या जगभरातील नागरिकांचं आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन केलं. हा कार्यक्रम आयुष मंत्रालयाने मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्था आणि इतर सहयोगी संस्थांच्या सहकार्याने आयोजित केला होता. कार्यक्रमा दरम्यान हॅबिल्ड संघाने मार्गदर्शन केलं.

**मिलिंद जोशी**

विनोद बुद्धी क्षीण होणं आणि हास्य लोपणं हे समाजाच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक अधोगतीचं लक्षण आहे, असं मत लेखक आणि वक्ते प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. आचार्य अत्रे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. आचार्य अत्रे साहित्याच्या आणि वक्तृत्वाच्या नभांगणातले लखलखते नक्षत्र होते, असे गौरवोद्गार जोशी यांनी काढले.

**पालखी**

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात, पालखी रथ ओढण्याचा तसंच चौघडा गाडीचा मान श्री संत तुकाराम महाराज संस्थानने खरेदी केलेल्या बैलजोड्यांनाच दिला जाणार आहे. पालखी सोहळाप्रमुख विक्रमसिंह महाराज मोरे यांनी आज ही माहिती दिली.

दरम्यान पालखी सोहळा काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना इंद्रायणी नदीत हजारो मृत मासे आढळून आले असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. प्रशासनाने तातडीने पाण्याचे नमुने तपासून, याचं कारण शोधावं आणि प्रदूषण रोखण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पर्यावरणप्रेमी करत आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३५ तर किमान २५ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या कमाल तापमानात काहीशी वाढ होण्याचा अंदाज आहे. दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचीही शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**